02 JUL 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुखांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०२१-२०२२' प्राप्त गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा व अधिविभागप्रमुखांचा सत्कार झाला. पदव्युत्तर प्रवेश विभागातर्फे वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत संलग्नित गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य.**

नऊ महाविद्यालये आणि एका अधिविभागाचा गुणगौरव झाला. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व डी. एस. कदम सायन्स कॉलेज, (गडहिंग्लज), दुधसाखर महाविद्यालय (बिद्री), वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतून देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), डॉ. घाळी कॉलेज (गडहिंग्लज), पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय (कवठेमहांकाळ, सांगली), मानव्यशास्त्र विद्याशाखेतून दि न्यू कॉलेज, डी. आर. माने महाविद्यालय (कागल), पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथअण्णा नाईकवडी आर्टस् कॉलेज (झरे), तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतून डेक्कन कॉलेज ऑफ इंटिरिअर डिझाईनचा समावेश होता. डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्यांचा प्रशस्तिपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यात डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. एम. के. पाटील, डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. एस. डी. पाटील, डॉ. एस. एम. कदम, डॉ. ए. बी. कोळेकर यांचा समावेश होता.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत प्रमुख उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी आभार मानले.

## विद्यापीठात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना अभिवादन



कोल्हापूर, ता. १ : माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आज अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, विधी अधिकारी अनुष्का कदम उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण करताना सेवानिवृत्त कर्मचारी धनाजी कुंडले. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी.**

त्यानंतर कृषी दिनाचे औचित्य साधून विद्यापीठाच्या खुल्या व्यायामशाळा परिसरात सेवानिवृत्त कर्मचारी धनाजी कुंडले, शिवाजी मोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पुढील काळात विद्यापीठाच्या प्रत्येक सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या हस्ते निवृत्तीच्या दिवशी एक रोप लावण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. जांभूळ व बहावाची ४० रोपे लावण्यात आली.

02 JUL 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदार नोंदणीसाठी उरले सहा दिवस

## २४ हजार जणांनी भरला अर्ज : ऑनलाइन प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या मतदार नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. याअंतर्गत नोंदणी करण्यास सहा दिवस उरले आहेत. दि. ७ जुलै रोजी मुदत संपणार आहे. विद्यापीठाकडे शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत एकूण २४०७४ ज़णांनी ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

अधिसभेच्या (सिनेट) निवडणुकीसाठी प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, महाविद्यालयीन शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी तसेच विद्या परिषदेच्या निवडणुकीसाठी महाविद्यालयीन शिक्षक त्याचप्रमाणे अभ्यास मंडळाच्या निवडणुकीसाठी महाविद्यालयीन विभाग प्रमुखांची मतदार यादी तयार केली जाणार आहे.

### १५८ कॉलेजची माहिती

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित विविध १५८ महाविद्यालयांतील शिक्षक आणि प्राचार्यांची माहिती विद्यापीठाला प्राप्त झाली असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

ऑनलाइन भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे पाठविण्याची मुदत दि. ११ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत आहे.

मतदार यादी तयार करण्यासाठी नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, प्रक्रिया काही विद्यार्थी, शिक्षकांच्या संघटना, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून पदवीधर नोंदणीसाठी अर्ज भरून घेण्यात येत आहेत.